| | |
|---|---|
| MHSN130008322024 | **फौ. कि. अर्ज क्र. ८५/२०२४**<br>**निशाणी क्र. ५ वरील आदेश**<br>(भारती पवार वि. गणेश पवार वगैरे) |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार पिडीत पत्नीने जाबदार यांच्याविरूद्ध कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरंक्षण अधिनियम, २००५ चे कलम २१ अन्वये मुलगा याचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह दि.१९/०४/२०१७ रोजी झालेला आहे. सदर लग्न संबंधातुन त्यांना दि.२२/०५/२०१९ रोजी एक मुलगा झालेला असुन त्याचे नाव राजवीर असे आहे. सामनेवाला याने अर्जदार हिला घराबाहेर काढले. मुलगा ४ वर्षांचा होईपर्यंत अर्जदार हिने त्याचे पालनपोषण केले. जाबदार हे अर्जदार हिला मुलासोबत फोनवर बोलु देत नाहीत. तसेच 'आईसोबत बोलायचे नाही, ती तुझी मम्मी नाही' असे सांगतात. अर्जदार माहेरी असताना तिची कोणतीही चौकशी जाबदार यांनी केलेली नाही. तसेच तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिस केलेल्या मारहाणीमुळे ती कृष बनली असुन तिला स्वत:चा सांभाळ करणे व तिच्या गरजा पुरवणे अतिशय कष्टप्रत झाले आहे. दि.१२.०९.२०२१ रोजी जाबदार हे राजवीर याला अर्जदार पासुन हिसकावुन घेवुन गेले. राजवीर हा अज्ञान आहे. त्यामुळे जाबदार त्याची काळजी व्यवस्थीत घेवु शकत नाहीत. त्याच्या बालमनावर वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे. राजवीर याला त्याच्या आईची अंत्यत आवश्यकता असुन त्याकरिता राजवीरचा ताबा अर्जदार हिस मिळणे न्यायाचे व जरूरीचे आहे. त्यामुळे राजवीरचा ताबा मिळावा अशी अर्जदार हिने विनंती केलेली आहे.

३. जाबदार क्र.१ यांना वेळोवेळी संधी देवुनही त्याने आपले म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांच्या विरूद्ध सदरचा अर्ज म्हणणे नसताना चालविण्यात आला.

४. वरील कथनावरून व कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरंक्षण अधिनियम, २००५ मधील तरतुदींचा विचार करता खालील वाद प्रश्न उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात मागणी केल्याप्रमाणे अर्जदार ही मुलगा राजवीरचा मिळण्यास पात्र आहे काय? | नाही. |
| २. | आदेश काय? | अर्ज नामंजुर |

## कारणमिमांसा

५. अर्जदारतर्फे विद्वान विधीज्ञ एन. व्ही. गरूड व जाबदार क्र.१ तर्फे विद्वान विधीज्ञ सपना द. बोडरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**वाद प्रश्न क्र.१ व २ करीता**

६. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार हिने तिचा मुलगा राजवीर याचा ताबा मागितलेला आहे. येथे एक गोष्ट नमुद करणे महत्वाची आहे की, मुलांच्या ताब्याचा विचार करताना त्यांच्या हिताचा न्यायालयाने नेहमीच सर्वोच्च विचार केला पाहिजे. कायद्याच्या स्थायिक स्थितीनुसार, कायद्याच्या कोणत्याही वैधानिक तरतुदी ह्या मुलांच्या हिताची जागा घेवु शकत नाहीत. मुलांच्या ताब्याचा प्रश्न हा नेहमी न्यायालयाने ज्या त्या प्रकरणाची प्राश्र्वभुमी तपासुन त्यातील कथनांच्या आधारे ठरवला पाहिजे.

७. प्रस्तुत प्रकरणामध्ये राजवीर हा साडे पाच वर्षांचा आहे. त्यामुळे त्याचा आई–वडिलांकडे असणारा एकदंर कल जाणुन घेण्यासाठी त्याला न्यायालयात बोलविण्यात आले होते. त्याची चौकशी केली असता, तो सध्या त्याचे वडील, आत्या व इतर नातेवाईक यांच्यासोबत मुबंई येथे राहत असुन शाळेला जातो, असे सांगितले. त्याचा सांभाळ त्याचे वडील जाबदार क्र.१ व आत्या करत असल्याचे सांगितले. त्याला भविष्यात कोणासोबत राहावयाचे आहे असे विचारले असता, त्याने त्याला वडिलांसोबत म्हणजेच जाबदार क्र.१ यांच्याकडे राहावयाचे आहे, असे सांगितले आहे. सदर चौकशीवरून त्याला एकदंरीत वडिलांच्याकडे राहण्याची इच्छा आहे, असे दिसुन येते.

८. तो वडिलांच्या छत्रछायेत व त्यांच्या प्रेमात वाढलेला असल्यामुळे आता त्याचा ताबा वडिलांच्याकडुन म्हणजेच जाबदार क्र.१ कडुन काढुन अर्जदार हिच्याकडे म्हणजेच त्याच्या आईकडे देणे उचित ठरणार नाही. जाबदार क्र.१ हे वडिल या नात्याने तसेच नैसर्गिक पालक असल्यामुळे ते त्याला नक्कीच प्रेम देवु शकतात. अर्जदार हिने अर्जामध्ये तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, असे कथन केले आहे. म्हणुन त्याचे पालनपोषण व इतर जबाबदाऱ्याही व्यवसिथत पार पाडु शकतात. त्यामुळे एकदंरीत परिस्थितीचा विचार करता अर्जदार हिच्याकडे मुलगा राजवीर याचा ताबा देणे योग्य व उचित होणार नाही. त्यामुळे अर्जदार हि मुलाचा ताबा मिळणेस पात्र नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

| **आदेश** |
|---|
| सदरचा अर्ज (निशाणी ५) नामंजुर करण्यात येतो. |

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL

Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2025.01.24 18:14:06 +0530

**(चंद्रकांत रा. पाटील)**

**दि. २४/०१/२०२५** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव.**

# प्रमाणपत्र

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखक | पुजा चु. कांबळे |
| न्यायालय | २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव |
| आदेश घोषीत दिनांक | २४/०१/२०२५ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २४/०१/२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | २४/०१/२०२५ |